Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

११ / २०२३

**विषय - राजर्षी शाहू रशियन व इटालियन चरित्राचे अनुवाद ग्रंथ प्रकाशन**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी/विद्यार्थीनीनां आदेशानुसार कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापूर जिल्हा प्रशासनामार्फत दि. ६ ते १४ मे २०२३ या कालावधीत **'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व २०२३'** या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राजर्षीच्या स्मृतिदिनी म्हणजेच शनिवार, दि. ६ मे २०२३ रोजी सकाळी १०.१५ वाजता मुख्य प्रशाकीय इमारतीमधील पोर्चमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन मा.कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांचे शुभहस्ते व डॉ.पी.एस.पाटील प्र-कुलगुरू व डॉ.व्ही.एन.शिंदे प्र.कुलसचिव यांच्या उपस्थितीत होणार आहे, तसेच सकाळी ११.०० वाजता शाहू संशोधन केंद्रामार्फत राजर्षी शाहू रशियन व इटालियन चरित्राचे अनुवाद ग्रंथ प्रकाशन सोहळा विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित केला आहे.

**सदर कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित रहावे.**

**प्र. कुलसचिव**

जावक क्रमांक आस्थापना/ ८४०

दिनांक :- 04 MAY 2023

प्रति,

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर व रोक्टर सर्व वसतिगृहे, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

३) अधीक्षक, मुलांचे व मुलींचे वसतीगृहे - सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीना याबाबत अवगत करून सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी उपस्थित राहतील यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

५) मा.संचालक शाहू संशोधन केंद्र यांना - राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुजनाच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कार्यवाही आपल्या विभागामार्फत करण्यात यावी.

➢ **सर्व अधिविभाग प्रमुख /विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक/प्रशासकीय अधिकारी /कर्मचारी/विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या निदर्शनास आणावे.**